फौजदारी किरकोळ अर्ज १५५/२०२३
नि.०१ लगत

# फिर्यादीचे व्हेरीफिकेशन

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव — ललीत गजानन बिरोले

वय — ४३ वर्ष धंदा — खाजगी नोकरी

निवासस्थान — रनाळा, ता. कामठी, जि. नागपूर

कारोना लॉकडाउन दरम्यान मी रॉयल युनीफॉर्म कंपनी, संसर मध्य प्रदेश येथे नोकरी करीत होतो. त्यावेळी माझ्या घरी रिकव्हरी एजेंट आले होते. माझे वडील त्यावेळी घरी होते. माझ्या वडीलांनी मला फोन केला व सांगितले की घरी रिकव्हरी एजेंट आले आहेत तु हिरो होंडाची मोटारसायकल घेतली आहे का, मी त्यांना सांगितले की मी घेतलेली नाही. माझ्या डे हिरो होंडाची गाडी नाही. मी त्या रिकव्हरी एजेंटसोबत फोनवर बोललो. त्यावेळी त्यांनी मला दुस–या दिवशी त्याच्या ऑफीसमध्ये बोलावीले. दुस–या दिवशी मी ऑटोमोटीव्ह चौकामध्ये त्यांच्या ऑफीसमध्ये गेलो. मी त्यांना सांगितले की मी कोणतीही दुचाकी घेतलेली नाही. त्यांनी मला सांगितले की तुमच्या नावाने कर्ज आहे. तुमचे दोन ते तीन धनादेश वटलेले आहेत व बाकीचे अनाधरीत झालेले आहेत. त्यानंतर मी कामठी पोलीस ठाण्यात गेलो व पोलीसांना मी सांगितले की माझ्या नावाने गाडी फायन्सास झालेली आहे परंतु मी गाडी घेतलेली नाही. त्यानंतर मी वारंवार पोलीस ठाण्यात गेल्यानंतर एक ते दिड महिन्यानंतर पोलीसांनी माझी तक्रार नोंदवून घेतली व मला एफआयआर ची कॉपी दिली. मी हिरो कंपनीच्या इसमांना माझा सिबील स्कोर खराब असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की सहा महिन्यात तुमचा सिबील स्कोर व्यवस्थीत होईल. परंतु आज अखेर माझा सिबील स्कोर व्यवस्थीत झालेला नाही व मला दिल्ली येथून दोन वेळा नोटीस आली आहे. माझ्यासोबत फसवणूक झालेली आहे. पोलीसांनी सांगितले की दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झालेले आहेत. पोलीसांनी दुचाकी वाहने जप्त केलेली आहे पण माझ्या नावाचे दुचाकी वाहन जप्त केलेले नाही. मी माझ्या वैयक्तीक कामासाठी तीन लाख रुपयाचे कर्ज काढण्यासाठी भारतीय स्टेट बॅकेत गेलो होतो. तेथे मला समजले की माझा सिबील

स्कोर खराब झाल्यामुळे मला कर्ज मिळू शकत नाही. मी कर्ज घेतलेले नसताना देखील मला हिरो कंपनीकडून वारंवार वसुलीसाठी फोन येत असतात. त्यामुळे मी प्रस्तुतची केस कोर्टात दाखल केली आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी

दिनांक –०९/०८/२०२३

(सागर एस. जाधव)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. २,

कामठी